# ३ कृषि विभाग

## १) कृषि प्रक्रिया व व्यापारक्षम शेती

### कृषिमालाच्या निर्यातीकरिता फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्याची सुविधा :

जागतीक व्यापार करारामध्ये सन १९९३ मध्ये कृषिमालाचा समावेश करण्यात आलेला आहे आणि सन २००५ पासून जागतीक बाजारपेठ खुली झालेली आहे. त्यामुळे कृषिमाल विविध देशांना निर्यातीकरिता संधी निर्माण झालेली आहे. त्याचबरोबर कृषिमालाची गुणवत्ता, क्रीड व रोगमुक्तता, उर्वरित अंश, वेष्टन इ. बाबींनाही विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

कृषिमालाची एका देशातून दुसऱ्या देशात निर्यात करताना किडी व रोगांचा प्रसार होऊ नये. तसेच त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक अन्न संघटनेने (FAO) सन १९५१ मध्ये आंतरराष्ट्रीय पीकसंरक्षण करार केलेला आहे. (International Plant Protection Convention, 1951) हा करार ''आंतरराष्ट्रीय पीकसंरक्षण करार'' म्हणून ओळखला जातो. कराराचा मुख्य उद्देश असा आहे, की कृषिमाल निर्यातीद्वारे मानव, प्राणी व पिकांना किडी व रोगांपासून हानी होऊ नये. तसेच त्यांच्या संरक्षणासाठी व ग्राहकाच्या आरोग्याच्या हितासाठी योग्य त्या कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचा अधिकार प्रत्येक देशास आहे. भारत देशही सदर कराराचा एक सदस्य देश आहे. सध्या १६५ देशांचा सदर आंतरराष्ट्रीय पीकसंरक्षण करारामध्ये समावेश आहे. त्यामध्ये प्रगत, प्रगतशील व अप्रगत देशांचाही समावेश आहे.

जागतिकस्तरावर कृषिमाल निर्याती संदर्भात अस्तित्वात असलेले करार खालीलप्रमाणे आहेत.

१) International Plant Protection Convention (IPPC)

२) Sanitary and Phytosanitary Measures (SPSM)

३) Technical Barrier on Trade (TBT)

४) Trade Related Intelectual Property Right (TRIPS)

५) International Standard for Phytosanitary Measures (ISPM)

| अ. क्र. | जिल्हा | कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| १) | पुणे | कृषि प्रक्रिया व व्यापारक्षम शेती विभाग,<br>कृषि आयुक्तालय, साखर संकूल, शिवाजीनगर, पुणे ५. | ०२०-२५५३४३४१<br>०२०-२५५१०६८४ | dagriprocess@rediffmail.com |
| २) | नासिक | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नासिक | ०२५३-२५०२१३५<br>०२५३-२५०१९३६ | dsaonsk@rediffmail.com |
| ३) | सांगली | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली | ०२३३-२३८१८१२ | dsaosangli@yahoo..co |
| ४) | सोलापूर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर | ०२१७-२७२६०१३ | dsagsolapur@gmail.com |
| ५) | अमरावती | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती | ०७२१-२६६०३७१ | ati-dsao@sancharnet.in |
| ६) | रत्नागिरी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रत्नागिरी | ०२३५२-२२२४११ | dsaorin@rediffmail.com |
| ७) | सिंधुदुर्ग | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सिंधुदूर्ग | ०२३६२-२२८७४० | saosindu@sancharnet.in |

सदर फायटोसॅनिटरी ॲथॉरिटींना कृषिमाल निर्यातीकरिता फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्यासाठी लागणाऱ्या सर्व त्या सुविधा/उपकरणे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

**कृषिमाल निर्यातीकरिता सर्वसाधारणपणे खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१) विहित प्रपत्र-१ मध्ये २ प्रतीत अर्ज, २) निर्यातदार व आयातदार यांच्यात करण्यात आलेल्या कराराची प्रत ३) प्रोफार्मा इनव्हाईसची प्रत ४) पॅकिंग लिस्ट ५) आयात निर्यात कोड नंबरची प्रत ६) कीडनाशक उर्वरित अंश तपासणी अहवाल (आवश्यकतेनुसार) ७) प्रतवारीबाबत ॲगमार्क प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार) ८) सोर्स ऑफ ओरिजन (उगम प्रमाणपत्र), ९) विहित केलेली फी भरल्याचे चलन.

वरील सर्व कागदपत्रांची पूर्तता करून सर्व माहितीसह संबंधित फायटोसॅनिटरी ॲथॉरिटीकडे अर्ज केल्यानंतर कागदपत्रांची छाननी करून त्यांची तपासणी नोंदवहीत नोंद करून प्रत्यक्ष मालाची पाहणी/तपासणी करून कृषिमाल निर्यातीकरिता संबंधित देशाच्या नावाने फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र दिले जाते. सदरच्या प्रमाणपत्राशिवाय कृषिमालाची निर्यात करता येत नाही. द्राक्ष निर्यातीकरिता रेसिड्यु मॉनिटरींग प्लॅन अंतर्गत निर्यातक्षम द्राक्षबागांची नोंदणी, तपासणी, उर्वरित अंश तपासणी, ॲगमार्क व फायटोसॅनिटरी प्रमाणिकरणाचे काम अपेडाच्या वेबसाईटवर ऑन लाईन (online) करण्यात येते.

निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी अपेडा या संस्थेच्या अर्थसहाय्याद्वारे राज्यात खालील ठिकाणी निर्यात सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले असून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. (०२०-२४२६११९०)

| अ. क्र. | पिकाचे नाव | निर्यात सुविधा केंद्र |
|---|---|---|
| १) | आंबा (हापूस) | नाचने, जि. रत्नागिरी, जामसंडे, जि. सिंधुदुर्ग |
| २) | आंबा (केशर) | जालना, जि. जालना, लातूर |
| ३) | केळी | सावंदा, जि. जळगाव, बसमतनगर, जि. हिंगोली |
| ४) | संत्रा | आष्टी, जि. वर्धा |
| ५) | डाळिंब | बारामती, जि. पुणे, इंदापूर, जि. पुणे |
| ६) | आंबा | व्हेपरहिट ट्रिटमेंट प्लॅट, वाशि, नवी मुंबई |

अधिक माहितीसाठी संचालक, कृषि प्रक्रिया व व्यापारक्षम शेती, कृषि आयुक्तालय, म. रा., साखर संकूल, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. येथे संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५५१०६८४, फॅक्स क्रमांक : ०२०-२५५३४३४१ E-mail-dagroprocess@rediffmail.com.

## २) फलोत्पादन विकास कार्यक्रम

### रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम

सन १९९० पासून सुरू झालेल्या या कार्यक्रमामधून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन योजना यशस्वी करून दाखविली आहे. योजना सुरू करण्यापूर्वी राज्यातील विविध फळझाडाखाली असलेले २.४२ लाख हेक्टर क्षेत्र आज १४.९६ लाख हेक्टरपर्यंत पोहचले आहे. सध्या योजनेमध्ये सुरुवातीच्या काळात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना त्यांनी लावलेल्या फळझाडांपासून उत्पादन मिळू लागले आहे. एवढेच नव्हे तर या सर्व प्रयत्नांमुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत माहे मार्च २००८ अखेर एकूण १३.११ लाख हेक्टर क्षेत्र विविध फळपिकांच्या लागवडीखाली आणण्यात आले आहे. यापैकी जवळपास ३,३१,००० हेक्टर लागवड ही पड व ओसाड जमिनीवर करण्यात आलेली आहे. राज्यात अजूनही मशागतयोग्य पड जमिनीचे क्षेत्र शिल्लक असून ते फळपिकाखाली आणण्यास भरपूर वाव आहे. राज्यातील सुमारे ४० हजार गावांमध्ये ही योजना पोहोचलेली आहे.

## कार्यक्रमाअंतर्गत लावण्यात येणारी फळझाडे :

या योजनेअंतर्गत खालील फळझाडांची लागवड करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

### १) सलग पद्धतीने लागवड

**अ) कोरडवाहू फळझाडे**

१) आंबा २) काजू ३) बोर ४) सिताफळ ५) आवळा ६) चिंच ७) फणस ८) कोकम ९) जांभूळ १०) कवठ ११) चारोळी १२) जोजोबा १३) बांबू १४) जॅट्रोफा (मोगली एरंड)

**ब) बागायती फळझाडे :**

१) नारळ २) संत्रा ३) मोसंबी ४) का. लिंबू ५) चिकू ६) डाळिंब ७) पेरू ८) अंजीर ९) सुपारी १०) तेलताड ११) रबर

**२) नारळ बागेत आंतरपिकांची लागवड :**

१) मिरी २) लवंग ३) जायफळ ४) दालचिनी ५) सुपारी

**३) भातखाचराचे बांधावरील लागवड :**

१) आंबा २) नारळ ३) काजू ४) पेरु ५) आवळा

**४) कातळ जमिनीत लागवड-आंबा :**

**५) औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड :**

१) आइरन २) अर्जुना ३) असन ४) अशोका ५) बेल ६) गुरग्गुळ ७) लोध्रा ८) रक्तचंदन ९) शिवण १०) टेटू ११) बेहडा १२) बिब्बा १३) डिकेमाली १४) हिरडा १५) रिठा १६) वावडींग १७) करंज १८) पानपिंपरी.

**६) बांधावर बांबूची लागवड :**

## लाभार्थी निवड व अर्हता :

ज्यांच्या नावावर जमीन आहे असे सर्व शेतकरी, विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यताप्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूतगिरण्या वगळून) यांना या योजनेचा लाभ घेता येईल. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व कुळाचे नाव ७/१२ च्या उतार्‍यावर असल्यास कुळाच्या संमतीने लागवड करता येईल.

## योजनेत सहभागी होण्यासाठी काय करावे ?

फळबाग योजनेमध्ये सहभागी होणार्‍यांसाठी संबंधित गावाचे कृषि सहाय्यक किंवा मंडळ कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. शेतकर्‍यांनी विनंती अर्जासोबत जमिनीचे ७/१२ व ८-अ चे उतारे, योजना यशस्वीपणे राबविणार असल्याबद्दलचे करारपत्र जोडणे गरजेचे आहे.

## किती क्षेत्रापर्यंत शेतकर्‍यांना लाभ घेता येईल ?

१) कोकण विभाग, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांसह पश्चिम घाट विभागातील उपलब्ध माहिती घ्यावी. तालुक्यात कमीतकमी ०.१० हेक्टर क्षेत्र व राज्यातील उर्वरीत भागात कमीतकमी ०.२० हेक्टर क्षेत्र आणि जास्तीतजास्त ४ हेक्टर क्षेत्रावर या योजनेअंतर्गत लागवड करता येईल. कोकण विभागात जास्तीतजास्त १० हेक्टर क्षेत्रावर लागवड करता येईल.

२) ज्या शेतकर्‍यांनी कार्यक्रमांतर्गत यापूर्वी भाग घेतला असेल, तर त्यांचे पूर्वीचे क्षेत्र गृहीत धरून एकूण ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत हा कार्यक्रम शेतकरी राबवू शकेल. मात्र पूर्वी त्यांचेकडे यापूर्वी जी लागवड करण्यात आलेली आहे, ती यशस्वी झालेली असली पाहिजे. कोकण विभागात जास्तीतजास्त १० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत हा कार्यक्रम राबविता येईल.

३) विश्वस्त कायद्यातील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यताप्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूतगिरण्या वगळून) यांचे क्षेत्रावर ४ हेक्टर कमाल मर्यादेपर्यंत लागवड करता येईल. कोकण विभागासाठी ही मर्यादा १० हेक्टरची राहील. ही लागवड एका वर्षात किंवा त्यानंतरच्या कालावधीत देखील करता येईल.

४) लाभधारकाचे ७/१२ वरील उताऱ्याच्या नोंदणीनुसार जर तो संयुक्त खातेदार असेल तर त्याच्या हिश्याचे क्षेत्राच्या प्रमाणानुसार लाभ देण्यात येईल.

## लाभार्थी शेतकऱ्यांच्या जबाबदाऱ्या :

योजनेत भाग घेणारा लाभार्थी हा गावातील त्यांच्या स्वत:च्या जमिनीवर काम करण्यासाठी स्वत:स व आपल्या कुटुंबातील कार्यक्षम व्यक्तीस रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रमाणित मजूर म्हणून घोषित करील.

योजनेअंतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके ही भाग घेणाऱ्या लाभार्थ्यांस मान्य करावी लागतील व निश्चित केलेल्या खर्च प्रमाणकापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी स्वत: लाभार्थ्यांस घ्यावी लागेल.

लाभार्थ्यांना देय अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी त्यांनी स्थानिक राष्ट्रीयकृत अथवा सहकारी बँकेत खाते उघडावे व खाते क्रमांक तालुका कृषि अधिकारी यांना कळवावा.

पूर्व पावसाळी कामे पूर्ण केल्याबद्दल लाभार्थ्याने मंडळ कृषि अधिकारी यांना कळवावे.

संपूर्ण लागवड कार्यक्रमासाठी पूर्वहंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड, पाणी देणे, कीटकनाशके/औषधे फवारणी करणे व झाडांचे संरक्षण करणे या गोष्टी लाभधारक शेतकऱ्याने स्वत: करावयाच्या आहेत, अशी लेखी संमती लाभधारकास द्यावी लागेल.

## लाभार्थी संस्थेच्या जबाबदाऱ्या :

लाभार्थी जर संस्था असेल, तर

अ) संबंधीत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना त्यांच्या स्वाक्षरीने करारनामा तयार करून प्रस्तावासोबत द्यावा लागेल.

ब) लाभार्थी संस्थेने या कार्यक्रमांतर्गत भाग घेण्याकरिता विहित ठराव करून प्रस्तावासोबत द्यावा लागेल.

क) वरील संस्थांनी रोजगार हमी योजनेच्या नियमानुसार मजुरांकडून काम करून घेणे आवश्यक असल्याने त्यांची उपलब्धता व त्यांच्याकडून काम करून घेणे व त्यासंबंधीचे प्रमाणपत्र संबंधित पदाधिकाऱ्यांनी द्यावे.

ड) लागवडीकरिता लागणारी सर्व कागदपत्रे लाभार्थी संस्थेने मिळवावयाची असून प्रकल्प अहवाल त्यांनीच तयार करावयाचा आहे.

## लाभार्थी कृषि विद्यापीठाच्या जबाबदाऱ्या :

कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर फळझाडांची लागवड करता येईल. त्या कार्यक्रमांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना या लागवडीस लागू राहतील.

## अनुदानाचे प्रमाण :

या योजनेअंतर्गत समाविष्ट झालेल्या सर्व लाभार्थींना त्यांनी केलेल्या कामानुसार मजुरीसाठी देय असलेले अनुदान १०० टक्के देण्यात येईल तथापि सामुग्रीसाठी देय असलेले १०० टक्के अनुदान हे अनुसूचित जाती/जमाती, नवबौद्ध, भटक्या जमाती, विमुक्त जमाती तसेच नाबार्डच्या व्याख्येनुसार असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना देण्यात येईल. तर उर्वरीत शेतकऱ्यांना सामुग्रीसाठी देय असलेल्या अनुदानाच्या ७.५ टक्के अनुदान देण्यात येईल. आयुक्त कृषि यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या राज्यस्तरीय समितीने २००८-२००१ साठी कलमा/रोपांच्या निश्चित केलेल्या दरानुसार देय अनुदान देण्यात येईल. देय अनुदानाचे वाटप ३ वर्षांपर्यंत करण्यात येईल. अनुदान वाटप करताना एकूण फळपीक खर्च प्रमाणकाच्या ५० टक्के प्रथमवर्षी, ३० टक्के द्धितीय वर्षी, २० टक्के तृतिय वर्षी अदा करण्यात येईल. अनुदानाच्या रकमेचा धनादेश बँकेकडे पाठविताना त्याची माहिती संबंधित लाभधारकास कळविण्यात येईल.

पहिल्या वर्षी लाभार्थ्याने केलेल्या कामाच्या प्रमाणकानुसार मापन पुस्तिकेत नोंद घेऊन मापदंडानुसार तपासणीनंतर देय असलेले अनुदान देण्यात येईल.

ज्या लाभार्थ्यांची दुसऱ्या वर्षी ७५ टक्के व तिसऱ्या वर्षी १० टक्के झाडे जिवंत असतील त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या/तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहील.

दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे जिवंत फळझाडांचे प्रमाण विहित मर्यादित ठेवले नाही तर त्यावर आतापर्यंत झालेला खर्च वसूलपात्र ठरवून वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

लाभार्थीकडे २० टक्क्यांपेक्षा जास्त कलमा/रोपांची मर असल्यास काही लाभार्थी रोखीने कलमे/रोपे विकत घेऊ शकत नाहीत, पर्यायाने जिवंत झाडांची टक्केवारी विहित प्रमाणात राखली जात नाही. म्हणून ज्या लाभार्थीकडे २० टक्क्यांपेक्षा जास्त कलमा/रोपांची मर आहे, असे लाभार्थीचे क्षेत्रावर जिवंत झाडाचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टिने नांग्या भरण्यासाठी आवश्यक लागणारी कलमे/रोपे यांचा पुरवठा परवाना पत्राद्वारे करण्यात यावा व जादा कलमा/रोपांची रक्कम संबंधित लाभार्थीच्या देय असलेल्या अनुदानातून कपात करण्यात यावी.

## कातळ जमिनीवर आंबा लागवड :

कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात लाभार्थीना कातळ जमिनीवर आंबा लागवड कमीतकमी ०.१० हेक्टर क्षेत्रावर व जास्तीतजास्त १० हेक्टर क्षेत्रावर करता येईल.

ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी या योजनेतून कातळ जमिनीवर आंबा लागवड व्यतिरिक्त १० हेक्टरपर्यंत फळबाग लागवड केली आहे अशा शेतकऱ्यांनादेखील या बाबीचा लाभ घेता येईल.

कातळ जमिनीवर आंबा कलमांची लागवड १० X १० मीटर अंतरावर करण्यात यावी.

## भात खाचरांचे बांधावर फळझाड लागवड

ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नाशिक, गडचिरोली, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यात भात खाचरांच्या बांधावर फळझाड लागवड करता येईल.

### अ) लाभधारक निवड अर्हता :

१) ज्या लाभार्थीनी रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत ४ हेक्टर व कोकण विभागासाठी १० हेक्टर क्षेत्रापर्यंत लाभ घेतलेला आहे, अशा लाभार्थीस या योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.

२) लाभधारकाने भात खाचरांच्या बांधावर फळबाग लागवड करण्यासाठी १ X १ X १ मीटरचा ओटा किंवा चौथरा तयार करणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय कृषि विकास योजना

अकराव्या पंचवार्षिक योजनेत कृषि विकासाचा दर ४ टक्के गाठण्याचे ठरविले असून त्यासाठी २००७-०८ पासून देशामध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान या दोन महत्त्वाकांक्षी योजना सुरू केलेल्या आहेत.

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेची ठळक वैशिष्ठ्ये :

१) कृषि आणि कृषि संलग्न क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणुकीचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यांना उत्तेजन देणे.

२) कृषि आणि कृषि संलग्न क्षेत्राचे संबंधित योजनांचे नियोजन व कार्यान्वय यामध्ये राज्यांना लवचिकता व स्वायत्तता देणे.

३) कृषि क्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक, हवामान उपलब्ध तंत्रज्ञान आणि नैसर्गिक साधन संपत्ती यावर आधारीत जिल्हा आणि राज्याकरिता कृषी योजना तयार करणे.

४) स्थानिक गरज, पिके आणि प्राधान्य याचा विचार करून त्यांना राज्यांच्या कृषि नियोजनामध्ये स्थान देणे.

५) महत्त्वाच्या पिकाच्या उत्पन्नातील तफावत कमी करणे.

६) कृषि आणि इतर संबंधित क्षेत्रामधील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे व शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे

७) कृषि व कृषि संलग्न क्षेत्रातील विविध घटकामधील उत्पादन आणि उत्पादकतेत सकारात्मक बदल करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

या योजनेसाठी देशभरात साधारणत: २५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्यात ही योजना राबविण्यासाठी खालीलप्रमाणे विविध समित्या स्थापन केलेल्या आहेत.

१) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती.

२) विभागीय आयुक्त, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय समिती.

३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती.

४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सहाय्य गट.

यात जिल्हास्तरीय समितीद्धारे जिल्ह्यातील कृषि व कृषि संलग्न यंत्रणांचे विविध योजना प्रकल्प तयार करून राबविण्यात येतील. या समितीने जिल्हा आराखडा तयार करणे, अंमलबजावणी करणे, समन्वय व सनियंत्रण करणे इ. कामे करावयाची आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या समितीचे सदस्य सचिव त्या जिल्ह्याचे कृषि उपसंचालक आहेत.

जिल्हा तांत्रिक सहाय्य गटात कृषि व कृषि संलग्न विभाग, कृषि विद्यापीठे इ. जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश राहील. हा गट जिल्हास्तरीय समितीस प्रकल्प/योजना तयार करताना तांत्रिक सहाय्य पुरविल.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत भात, गहू व कडधान्य या अन्नधान्य पिकांचे उत्पादन अनुक्रमे १०, ८ व २ असे एकूण २० दशलक्ष टनाने वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यात पीकनिहाय पुढीलप्रमाणे विविध घटकांवर भर देण्यात येणार आहे.

## अ) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान-भात :

या पिकासाठी भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नाशिक व पुणे या ६ जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून यात पुढीलप्रमाणे घटकांचा समावेश आहे.

| अ. क्र. | बाब | अनुदानाचे प्रमाण रु. |
|---|---|---|
| १) | पीक प्रात्यक्षिके (०.४० हे. प्रती प्रात्यक्षिक) | |
| | अ) सधन भात पद्धती | ३०००/- प्रती प्रात्यक्षिक |
| | ब) संकरीत भात तंत्रज्ञान | ३,०००/- प्रती प्रात्यक्षिक |
| २) | संकरीत बियाणे उत्पादनाकरिता अर्थसहाय्य | किंमतीच्या ५० टक्के रु. १,०००/- प्रती क्विंटलच्या मर्यादित |
| ३) | प्रमाणित भात बियाण्यावर अनुदान | किंमतीच्या ५० टक्के रु. ५००/- प्रती क्विंटलच्या मर्यादित |
| ४) | संकरीत बियाणे वाटपासाठी अर्थसहाय्य | किंमतीच्या ५० टक्के रु. २,०००/- प्रती क्विंटलच्या मर्यादित |
| ५) | भात बियाणे मिनिकीट वाटप | ५ किलो बियाणे प्रती मिनिकीट १०० टक्के अनुदानावर |
| ६) | सूक्ष्म मूलद्रव्यांचा वापर वाढविणे (२ हेक्टर प्रती शेतकरीच्या मर्यादेचा) | किंमतीच्या ५० टक्के रु. ५००/- प्रती हेक्टरच्या मर्यादित |
| ७) | कोनोवीडरचा आणि कृषि अवजारांसाठी अर्थसहाय्य | किंमतीच्या ५० टक्के रु. ३,०००/- प्रती अवजाराच्या मर्यादेत |
| ८) | एकात्मिक कीड व्यवस्थापन (२ हेक्टर प्रती शेतकरीच्या मर्यादेत) | किंमतीच्या ५० टक्के रु. ५००/- प्रती हेक्टरच्या मर्यादेत |
| ९) | शेतकरी प्रशिक्षण (शेतीशाळा) | रु. १७,०००/- प्रती शेतीशाळा |
| १०) | सामूहीक भात रोपवाटिका | रु. ४०,०००/- प्रती हेक्टर |

## ब) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान-गहू :

या अभियानांतर्गत राज्यातील अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, नागपूर, नाशिक, परभणी, पुणे व सोलापूर या ८ जिल्ह्यांची निवड झाली आहे. या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | बाब | अनुदानाचे प्रमाण (रु.) |
|---|---|---|
| १) | पीक प्रात्यक्षिक(०.४० हे. प्रति प्रात्यक्षिक) | रु. २,०००/- प्रती प्रात्यक्षिक |
| २) | प्रमाणित बियाणे वाटप अनुदान | किंमतीच्या ५० टक्के रु. ५०० प्रती क्विंटलच्या मर्यादित |
| ३) | बियाणे मिनिकीट वाटप ५ किलो प्रती मिनिकीट | १०० टक्के |
| ४) | सूक्षम मूलद्रव्याच्या वापरासाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य | किंमतीच्या ५० टक्के रु. ५००/- प्रती हेक्टर मर्यादित |
| ५) | जिप्सम वापरासाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य (क्षारपड क्षेत्रासाठी) | किंमतीच्या ५० टक्के रु. ५००/- प्रती हेक्टर मर्यादित |
| ६) | शून्य मशागत पेरणीयंत्र | किंमतीच्या ५० टक्के रु. १५,०००/- प्रती यंत्र मर्यादित |
| ७) | रोटोव्हेक्टर | किंमतीच्या ५० टक्के रु. ३०,०००/- प्रती यंत्र मर्यादित |
| ८) | पंपसेट खरेदी (विद्युत तसेच डिझेल पंप) | किंमतीच्या ५० टक्के रु. १०,०००/- प्रती इंजिनच्या मर्यादित |
| ९) | शेतकरी शेतीशाळा | रु. १७,०००/- प्रती शेतीशाळा |
| १०) | उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्ह्यांसाठी पुरस्कार | रु. ५.०० लाख प्रती वर्ष (पूर्ण रक्कम) |
| ११) | स्थानिक पातळीवर विकसीत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन | ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये, ज्या जिल्ह्यामध्ये रा. अ. सु. अभियानांतर्गत समाविष्ट असलेली दोन अथवा तीन पिके घेण्यात येत असतील तर रु. २.०० कोटी आणि एक पीक असेल तर रु. १.०० कोटी प्रती जिल्हा याप्रमाणे |

## क) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-कडधान्य :

या अभियानातंर्गत राज्यातील नाशिक, जळगांव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर व चंद्रपूर या १८ जिल्ह्यांची निवड झाली आहे. या अभियांनातर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | बाब | अनुदानाचे प्रमाण (रु.) |
|---|---|---|
| १) | कडधान्य मूलभूत बियाणे खरेदी आयसीएआर यांचेमार्फत | केंद्र शासनाच्या कृषि विभागातील बियाणे विभागाने निश्चित केलेल्या दरानुसार |
| २) | कडधान्य पायाभूत व प्रमाणित उत्पादन | रु. १००/- प्रती क्विंटल |
| ३) | प्रमाणित बियाणे वाटपासाठी अर्थसहाय्य | रु. १,२००/- प्रती क्विंटल किंवा रकमेच्या ५० टक्के |
| ४) | राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेचे बळकटीकरण | रु. २५.०० लाख प्रती राज्य प्रतिवर्ष |
| ५) | एकात्मिक खत व्यवस्थापन (जिप्सम) | रु. ७५०/- प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० टक्के |

| | | |
|---|---|---|
| ६) | एकात्मिक खत व्यवस्थापन (सूक्ष्म मूलद्रव्य) | रु. ५००/- प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० टक्के |
| ७) | एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) | रु. ७५०/- प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० टक्के |
| ८) | प्रसिद्धी प्रसार माध्यमे माहिती तंत्रज्ञान | रु. १,००,०००/- पन्नास शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी एक रकमी अनुदान रु. ५० लाख प्रती राज्य/प्रतीवर्ष |
| ९) | शेतकरी शेतीशाळा | रु. १७,०००/- प्रती शेतीशाळा |
| १०) | जिल्हास्तरीय प्रकल्प व्यवस्थापन संघ/करारसेवा पीओएल व इतर खर्च यांच्या समावेशासह इतर संकीर्ण खर्च | पूर्ण रक्कम रु. ५.०० लाखाच्या मर्यादित प्रती जिल्हा प्रतीवर्ष |
| | अ) जिल्हास्तर १) एक सल्लागार | रु. १५,०००/- प्रती माह |
| | २) तंत्र सहाय्यक | रु. ८,०००/- प्रती माह |
| | आकस्मिक खर्च | रु. ७५,०००/- प्रती वर्ष |
| | ब) राज्यस्तर १) एक सल्लागार | रु. २०,०००/- प्रती माह |
| | २) तंत्र सहाय्यक | रु. १२,००० प्रती माह |
| | आकस्मिक खर्च | रु. १.०० लाख प्रती वर्ष |

•••

## शेतकऱ्यांना खुषखबर

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने तळेगाव दाभाडे प्रक्षेत्रावरील फळरोप वाटिकेमध्ये विविध प्रकारची कलमे/रोपे तयार केली असून सदर रोपे विक्रीस उपलब्ध आहेत. सदर रोप वाटिका महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त असून रोप वाटीकेत रोपे शासकीय दराने उपलब्ध आहेत. खात्रीशीर आणि दर्जेदार रोपांसाठी संपर्क साधा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नारळ | रोपे | बाणवली, प्रताप |
| २. | पेरू | कलमे | सरदार |
| ३. | चिंच | कलमे | प्रतिष्ठान, कोहिनूर |
| ४. | आवळा | कलमे | एन. ७ |
| ५. | चिकू | कलमे | कालीपत्ती |
| ६. | सीताफळ | कलमे | बाळानगर |
| ७. | आंबा | कलमे | केशर, हापूस, दशहरी |
| ८. | अंजीर | रोपे | पुना फिग, दिनकर |

**व्यवस्थापक (शेती)**
**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ**
**सर्व्हे नं. ३९८-४००, सी.आर.पी.एफ. कँपस जवळ**
**पुणे मुंबई महामार्ग, तळेगाव दाभाडे,**
**ता. मावळ, जि. पुणे पिन - ४१०५०६,**
**फोन - ०२११४-२२३२५१,**
**०२०-२४२६११९०**